# प्रेसनोट

नाशिक,

दि. १३/०६/२०२२

आलोसे कारभारी भिला यादव, पोलीस हवालदार ब.न.१२५५ नेमणुक ओझर पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण यांना २,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक करून त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कारवाई केलेबाबत..

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | पंचवटी पोलीस स्टेशन, नाशिक शहर, गु.र.नं.२१४/२०२२ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | कारभारी भिला यादव, पोलीस हवालदार ब.न.१२५५ नेमणुक ओझर पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २०००/— रुपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | **२०००/— रुपये** |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचे विरूध्द मा. न्यायालयात दाखल असलेल्या एम.आय.ॲक्ट कलम १३८ च्या चेक बाऊन्सच्या केसमध्ये तक्रारदार यांचेविरूद अटक वॉरंट निघालेले आहे. सदर वॉरंट बजावणीचे काम आलोसे कारभारी भिला यादव, पोलीस हवालदार ब.न.१२५५ नेमणुक ओझर पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण यांचेकडे असल्याने त्यांनी, तक्रारदार यांना चेक बाऊन्सच्या केसमध्ये जामीनदारांचे कागदपत्र घेवुन, पकड वॉरंटमध्ये सहकार्य करण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे २०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे कारभारी भिला यादव, पोलीस हवालदार ब.न.१२५५ नेमणुक ओझर पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण यांनी तक्रारदार यांचे कडून पंच व साक्षीदार यांचे समक्ष **२०००/—रूपये** लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दिनांक १२/६/२०२२ रोजी खोकलाई मंदीरासमोर, सिता गुफारोडवर पंचवटी नाशिक येथे **स्विकारली** असता त्यांना पकडण्यात आल्याने त्यांचेविरुध्द पंचवटी पोलीस स्टेशन, नाशिक शहर, गु.र.नं.२१४/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि. १२/०६/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई—मेल :— spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :— ९९३०९९७७००

(सतिश भामरे)
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.